International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 6.457
Vol.6 No.6 July–Aug 2019

# हुपरी नगरातील चांदी उद्योगाच्या समस्या: एक भौगोलिक अभ्यास

**प्रा. आर. आर. साळुंखे**
*सहयोगी प्राध्यापक व भूगोल विभाग प्रमुख,*
*सी.एस.एस.कॉलेज, हुपरी, जि. कोल्हापूर*

**घोषवारा:**

*चांदीचे शुद्धीकरण आणि दागिन्यांचे उत्पादन हे भारतातील पारंपारिक हस्तकलेपैंकी एक आहे. स्वातंत्र्यानंतर चांदी उद्योगाचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. कोणत्याही प्रदेशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात चांदीचा उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतो. देशाच्या अर्थव्यवस्थेत चांदी उद्योगाला सध्या महत्त्वाचे स्थान आहे. त्यातून हजारो लोकांना रोजगार मिळतो. भारतात हुपरी हे नगर हाताने बनवलेल्या चांदीच्या दागिन्ने तयार करणासाठी प्रसिद्ध आहे, परंतु या उद्योगाचा गुणात्मक विकास फारच मर्यादित आहे. प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्टे हुपरी गावातील चांदीच्या उद्योगाच्या समस्यांचा अभ्यास करणे व उपाय सुचविणे हे आहे. सदरचा शोध निबंध हा प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीवर आधारित आहे. प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी हुपरीतील चांदी उद्योगातील कारखानदार तसेच कामगार तसेच व्यावसायिक कुटुंब प्रमुखासाठी अनुसूची तयार केली. मुलाखती व्दारे माहिती मिळविली. याशिवाय प्रत्यक्ष निरीक्षणाने व छायाचित्रद्वारे माहिती मिळवण्यात आलेली आहे. द्वितीय स्वरूपाची आकडेवारी कोल्हापूर जिल्हा जनगणना अहवाल- २०११ स्थलदर्शक नकाशा, जर्नलस, शोध निबंध, मासिके, वर्तमानपत्रे, संदर्भ ग्रंथ व चांदी उद्योग असोसिएशन, हुपरी यांच्या कार्यालयातून मिळवलेली आहे. माहितीचे सारणीकरण करून तिच्यावर संस्करण करून मिळालेल्या तथ्यांचे विश्लेषण केले आहे.या उद्योगासंदर्भात अनेक समस्या आढळून आल्या. हुपरी शहरातील चांदी उद्योगाला भेडसावणाऱ्या असंख्य समस्या असूनही, चांदी उद्योगाच्या भविष्यातील वाढ आणि विकासासाठी अनेक संधी आणि संधी आहेत.*

***बीज संज्ञा: कुशल, दागिने, भांडवल, मार्केटिंग, फिरती, समस्या, उपाय***

**प्रस्तावना :**

चांदी या धातूपासून दागिने बनवण्याचा उद्योग हा भारतातील प्राचीन हस्त उद्योगापैंकी एक आहे. कारण चांदी हा धातू अतिशय महागडा आकर्षक आणि लगेच

वितळणारा असल्यामुळे त्याचा उपयोग दागिने बनवण्यासाठी होतो. फार प्राचीन काळापासून स्त्रिया तसेच पुरुष सुंदर दिसण्यासाठी दागिन्यांचा उपयोग करतात. याशिवाय दागिने व्यक्तीचा सामाजिक व आर्थिक दर्जा दर्शवितात स्वातंत्र्योत्तर काळात चांदी उद्योगाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. परंतु हा उद्योग विखुरलेल्या अवस्थेत पहावयास मिळतो. चांदी उद्योगांमध्ये अनेक लोक गुंतलेली दिसतात. बऱ्याच प्रदेशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात या उद्योगांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे त्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेत देखील हा उद्योग उद्योगास महत्वपूर्ण स्थान आहे.

**अभ्यास क्षेत्र**:

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील दक्षिण भागात महाराष्ट्र-कर्नाटक सीमेलागत, पंचगंगा नदी खोऱ्यात हुपरी हे गांव वसले आहे. या गावाचे स्थान १६° ३८' उत्तर अक्षवृत्त ते ७४° २३' पूर्व रेखावृत्त आहे. हुपरी हे गांव कोल्हापूर या जिल्ह्याच्या ठिकाणापासून 25 किलोमीटर व हातकणंगले तालुक्याच्या ठिकाणापासून दक्षिणेस १५ किलोमीटर अंतरावर आहे. या गावाचे भौगोलिक क्षेत्रफळ 1715 हेक्टर आहे. तर समुद्र सपाटीपासूनची उंची ५६५ मीटर आहे. या नगराची भूपृष्ठरचना विचारात घेतली असता असे लक्षात येते की, हे नगर उंच सखल भागावर वसलेले आहे. याचा परिणाम वसाहतीच्या रचना तसेच वाहतूक मार्ग व सांडपाणी (गटारी) व्यवस्थेवर झालेला आहे. हुपरीचे हवामान उष्ण व कोरडे आहे. हे गांव अवर्षण प्रवणक्षेत्रात येते. येथे उन्हाळा, पावसाळा व हिवाळा हे तीन ऋतू आहेत. उन्हाळा मार्च ते मे महिन्यात असतो तर जून ते सप्टेंबर या कालावधीत पावसाळा ऋतूमध्ये पाऊस पडतो. येथे वार्षिक सरासरी ७० ते ८२ मिलीमीटर पाऊस पडतो. हा पाऊस नै.मोसमी वाऱ्यापासून पडतो तर ऑक्टोबर ते फेब्रुवारी या कालावधीत हिवाळा ऋतू असतो. येथील कमाल तपमान 38 अंश सेल्सिअस असते किमान तपमान 15 ते 17 अंश सेल्सिअसच्या दरम्यान असते. हे गाव पंचगंगा नदीखोऱ्यात असल्यामुळे येथे काळी मृदा आढळते परंतु नगराच्या दक्षिणेकडील ठिकाणी खडकाळ-मुरमाड जमीन आढळते. 'शेती' हा येथील प्रमुख व्यवसाय असला तरी चांदी उद्योगासाठी हे गांव महाराष्ट्रात तसेच देशात प्रसिद्ध आहे. २०११ च्या जनगणनेनुसार हुपरीची एकूण लोकसंख्या २८९५३ इतकी होती. त्यामध्ये पुरुष १४६५३ तर स्त्रीयांची संख्या १४३०० इतकी होती. एकूण लोकसंख्येमध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या ४१६८ व अनुसूचित जमातीची

लोकसंख्या १८० होती. एकूण लोकसंख्येपैकी साक्षरतेचे प्रमाण ७५.९० टक्के आहे. तर निरीक्षर लोकांचे प्रमाण जवळ २४.०९ टक्के आहे. तर १००० पुरुषा मागे व स्त्रियांचे प्रमाण १०२५ इतके आहे.

**हुपरी येथील चांदी हस्तकला व्यवसायाची जडणघडण, पूर्व इतिहास व परंपरा:**

हुपरी शहरास लावण्यरूपी परि म्हणतात. सौभाग्यरूपी नारी म्हणतात. कारण ही चांदी हस्तकला कारागिरांची रजत नगरी आहे. थोर राजे – महाराजे, श्रेष्ठ संत पुरुष महात्मे यांच्या पवित्र पदस्पर्शाने व क्षेत्र अंबाबाईच्या पुण्य वास्तव्याने पावन झालेल्या भूमीला हुपरी म्हणतात. चांदी हस्तकलेच्या जडणघडणीचा वृत्तांत असा सांगितला जातो की, साधारणत: तेराशे सालात देवगिरी राजे श्री रामचंद्रराव यादव यांच्या काळात विजापूरहून कोकण भागात जाणाऱ्या व्यापाऱ्यांसाठी हुपरी विसाव्याचे ठिकाण होते. पुढे असे शे-दोनशे वर्षांनी श्री अंबामातेच्या दिव्य साक्षात्काराने देवीच्या मूर्तीची येथे प्रतिष्ठापना करून देऊळ बांधले गेले आणि तिथूनच गावाची पुर्णवसाहत निर्माण होत गेली. पुढे इ.स. १७५० च्या सुमारास हुपरी हे गाव कोल्हापूर संस्थानिकाकडून सांगलीच्या पटवर्धनानी जिंकले. नवकोट नारायणास गहाण टाकले. त्यांनी हुपरीच्या संरक्षणासाठी भुईकोट किल्ला बांधला पण इ.स. १८०० च्या वेळी निपाणीकर देसाई यांनी हल्ला करून हुपरी हे गाव किल्ल्यासह ताब्यात घेतले. परंतु कोल्हापूरच्या छत्रपतींनी हे गाव पुन्हा काबीज केले आणि तेव्हापासून हुपरी गावाची सुधारणा होत गेली. कोल्हापूर संस्थानांनी हुपरी पार्क करून सन १८७२ मध्ये मराठी शाळा सुरू केली. तसेच मुनसप कोर्ट सुरू केले सरकारी चावडी त्यावेळी कर वसुलीसाठी सोनार लोक होते ते मागणीप्रमाणे कोल्हापूर येथील राजघराण्यास सन समारंभाचे वेळी हत्ती घोडे यांना घालण्यास विविध नक्षिचे चांदीचे दागिने कसबी कारागरांच्या साह्याने करून देत होते.

सुमारे १०० ते १५० वर्षांपूर्वी दोन ते तीन हजार लोकवस्तीचे जिरायत शेतीप्रधान असलेली हुपरी गाव होते. त्यावेळी सरकारी दरबारच्या कोर्ट कचेरीमुळे लोकात चतुराई व कुशाग्र बुद्धि तेज होते. आपण काहीतरी नवीन करावे अशी धमक अंगी होती दादोबा केशव पोतदार व वामन कृष्णाची पोतदार या दोन तरुण सोनारानी चांदी हस्तकला उद्योगाबरोबर हातप्रेसवर नक्षी डिझाईन तयार करू लागले. स्वतःच्या कौशल्याने बुद्धीने व मनगटाच्या जोरावर युवक हस्तकलेचे चांदीचे दागिने उदाहरणात कोयली, मासोळया, जोडवी, चाळ, पैंजण, घागरी, कडदोरे, छल्ले,

वाळे व तोडे इत्यादी बनवून हुपरी चांदी हस्तकला उद्योगाचे सन १९०४ मध्ये चंदेरी मंगलमय रोपटे लावले आज त्याचा वटवृक्ष झालेला पहावयास मिळतो.

सर्वप्रथम पोतदार बंधूंनी चांदी हस्तकलेचे दागिने बनवून कोल्हापूर, सांगली, बेळगाव व पंढरपूर या शहरात दागिने खरेदी विक्रीचा व्यवसाय सुरू केला. सुबक हस्तकला कलाकुसर केलेल्या चांदीचे दागिन्यांची सुबकता पाहून दिवसेंदिवस त्याची मागणी वाढू लागली. गावातील चाणाक्ष व हुशार मुले त्यामुळे कामाला लागली. चांदी हस्तकला व्यवसायात आलेली तरबेज व पारंगत असलेली मुले अनेक जाती धर्माची होती. त्यांनी व्यवसायातील मर्म ओळखून सदरचा व्यवसाय चार भिंतीबाहेर काढला व भरभराटीस सुरुवात झाली.

सन १९३० च्या मंदिरा मंदीच्या काळानंतर दुसऱ्या महायुद्धानंतर इतर धंद्याप्रमाणे चांदी हस्तकला उद्योगाशी तेजीचा काळ लाभला तरुणांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे दागिन्यांच्या नमुन्यात सुद्धा अमुलाग्र बदल होत गेला. ग्राहकांच्या आवडीनुसार व मागणीनुसार ब्रासलेट नेकलेस व पैंजण अशा प्रकारच्या चारशे ते पाचशे नमुन्यांचे दागिने तयार होऊ लागले. मीनाकाम, तासकाम यामुळे दागिण्यात सुबकता व आकर्षकपणा आला. हुपरी येथे तयार होणारे दागिने चेन्नई, हुबळी, म्हैसूर, मुंबई, हैदराबाद, नागपूर व अहमदाबाद यासारख्या शहरा बरोबर सर्व भारतभर पोहचू लागला. जुन्या जाणकार मंडळींच्या कृपाशीर्वादामुळे नवीन होतकरू कसबी कारागीरणा संधी मिळाली. चांदी बदला व्यवहार सुरू झाले. अनेक गरीब कष्टकरी हातांना काम मिळून त्यांचे संसार उदयोन्मुख होण्यास मदत झाली. बाहेर खेड्यापाड्यातील लोक व्यवसायानिमित्त हुपरीमध्ये स्थायिक होऊ लागले. अनेक कुशल कारागरांचे कलाकार झाले. काही उद्योजक बनले. अशाप्रकारे चांदी व्यवसायाची दिवसेंदिवस प्रगती होऊ लागली.

**अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा**:

सदरच्या अभ्यास फक्त चांदी उद्योगामधील समस्यां व त्यावरील उपाय यापुरताच मर्यादित आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे**:

प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. हुपरी गावातील चांदीच्या उद्योगाच्या समस्यांचा अभ्यास करणे

२. हुपरी गावातील चांदी उद्योगातील समस्यांवर उपाय सुचविणे.

**शोध निबंधच्या विषयाची निवड**:

संशोधक गेली सतरा-अठरा वर्षे हुपरी या नगरात राहत आहे. त्यामुळे येथील उद्योगांमध्ये कोणकोणत्या समस्या आहेत यांचे जवळून निरीक्षण केले असल्यामुळे या समस्या मांडण्याचा व त्यावरील उपाय सुचविण्याचा प्रयत्न या शोध निबंधामध्ये केलेला आहे.

**सांख्यिकी स्त्रोत व अभ्यास पद्धती**:

सदरचा संशोधन पेपर हा प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीवर आधारित आहे. प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी हुपरीतील चांदी उद्योगातील वेगवेगळया भागांना भेटी दिल्या त्यामध्ये बुलियन, टंच, आटणी, कंपनी, प्रेस, धडी, पॉलिशिंग, व्हायब्रेटिंग तसेच मार्केटिंग इत्यादी विभागांचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. व्यावसायिक कुटुंब प्रमुखासाठी अनुसूची तयार केली. गावात एकूण १७ प्रभाग आहेत. या प्रत्येक विभागातील २० उद्योजकांची मुलाखती द्वारे माहिती मिळवली. प्रत्यक्ष निरीक्षणाने व छायाचित्रद्वारे माहिती मिळवण्यात आलेली आहे. द्वितीय स्वरूपाची आकडेवारी कोल्हापूर जिल्हा जनगणना अहवाल- २०११ स्थलदर्शक नकाशा, जर्नलस, शोध निबंध, मासिके, वर्तमानपत्रे, संदर्भ ग्रंथ व चांदी उद्योग असोसिएशन, हुपरी यांच्या कार्यालयातून मिळवलेली आहे. माहितीचे सारणीकरण करून तिच्यावर संस्करण करून ती योग्य त्या आकृती, आलेख व नकाशा द्वारे दर्शवून मिळालेल्या तथ्यांचे विश्लेषण केले आहे.

**हुपरी नगरातील चांदी उद्योगाच्या समस्या:**

हुपरीच्या सामाजिक व आर्थिक विकासात चांदी उद्योगाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. या उद्योगामुळे अनेकांना रोजगार प्राप्त झाला. हुपरीचे दागिने संपूर्ण भारतभर प्रसिद्ध आहेत. परंतु या उद्योगाच्या संख्यात्मक विकास जास्त झाला असला तरी गुणात्मक विकास मर्यादित आहे. या उद्योगाच्या समस्या खालील प्रमाणे आहेत

१. **अनियमित वीज पुरवठा:** चांदी उद्योगासाठी वीज हा घटक महत्त्वाचा आहे. कारण बहुतांश विभागात विजेवर चालणाऱ्या मशनरींचा व उपकरणांचा वापर केला जातो. त्यामुळे वाढत्या भारनियमनाचा चांदी उद्योजक व कामगारांना फटका बसतो प्रति दिन नियमित चार तास भारनियमन शिवाय मध्यंतरी एक दोन तास वीज पुरवठा खंडित केला जातो. त्यामुळे चांदी उद्योगातील वेगवेगळया विभागांना आपली दुकाने बंद ठेवावी लागतात. याचा परिणाम उत्पादन घटण्यात व आलेल्या ऑर्डर्स वेळेत पूर्ण न करण्यात होतो तसेच याचा परिणाम कामगारांच्या वेतनावर देखील होतो. कारण त्यांचे वेतन हे एकूण उत्पादनावर अवलंबून

असते. याशिवाय जर विजेचा प्रति युनिट दर वाढले तर उत्पादन खर्चात वाढ होते व नफाही कमी होतो.

२. **प्रदूषणाची समस्या:** चांदी उद्योगांच्या दागिन्यांच्या पॉलिसींगसाठी वेगवेगळया प्रकारचे सिडस वापरावे लागतात व ती प्रक्रिया न करता गटारी व्दारे नदीला सोडली जातात त्यामुळे पाणी व जमिनीचे प्रदूषण होते तसेच चांदी उद्योगातील कंपनी, प्रेस, सूत मशीन, धडी, व्हायब्रेटर या विभागांमध्ये मशनरींचा वापर केला जातो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण घडून येते. याचा परिणाम परिसरातील नागरिक व तेथे काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्यावर होतो.

३. **मजुरांची समस्या**: चांदीचे दागिने बनविण्याचे काम सूक्ष्म व कलाकुसरीचे असते. यासाठी कुशल कारागिरांची आवश्यकता असते. परंतु कुशल कारागीर येथे सहज उपलब्ध होत नाहीत. चांदी उद्योगातील कामामुळे वेगवेगळया प्रकारचे शारीरिक आजार होतात. तसेच वारंवार येणारी मंदी कामाच्या बाबत अनिमितता यामुळे मजूर जवळच्या औद्योगिक वसाहती मध्ये नियमित व अधिक वेतन मिळत असल्याने जातात. बऱ्याच मजुरांच्या बाबतीत ॲडव्हान्स घेऊन इतरत्र एमआयडीसी, यंत्रमाग, बेकरी किंवा शेतमजुरी इत्यादी ठिकाणी काम करण्यासाठी जातात. ही देखील एक समस्या आहे.

४. **आरोग्याच्या समस्या:** चांदीचे दागिने बनवण्याचे काम अत्यंत सूक्ष्म व कलाकुसरीचे असते त्यामुळे कामगारांना एका जागी बराच काळ बसून बारकाईने काम करावे लागते याचा परिणाम कामगारांच्या आरोग्यावर होतो चांदी उद्योगातील कामगारांच्या मुलाखती दरम्यान बऱ्याच जणांनी डोळयाचा, कंबरेचा तसेच मणक्याचा त्रास असल्याचे सांगितले तसेच चांदी उद्योगातील कंपनी, प्रेस. सूत मशीन, धडी, व्हायब्रेटर या विभागांमध्ये मशनरींचा वापर केला जातो. या मशनरी पासून निर्माण होणाऱ्या आवाजाचा परिणाम त्या परिसरातील नागरिक व तेथे काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्यावर झालेला आढळून आला. सततच्या आवाजामुळे बहिरेपणा, निद्रानाश एकाग्रता भंग पावणे, व्यक्तीची कार्यक्षमता कमी होणे, व्यक्ती चिडखोर बनणे यासारखे आजार निर्माण होतात. चांदी उद्योगात दागिन्यांच्या पॉलिशिंगसाठी वेगवेगळया प्रकारचे ॲसिड वापरले जाते याचाही परिणाम श्वसन संस्था व फुफुसावर होतो.

५. **मंदीची समस्या**: चांदीच्या उद्योगधंद्यावर चांदीचा भाव / दर यातील चढउताराचा परिणाम होतो. चांदीच्या भावात अचानक वाढ झाल्यास दागिन्यांची मागणी कमी होऊन मंदी येते. तसेच चांदीच्या दागिन्यांची मागणी काही विशिष्ट महिन्यात कालावधीत जास्त असते. कारण लग्नसराई, सन समारंभ यावेळी भारतात दागिने अधिक वापरले जातात. परंतु इतर कालावधी यासाठी मंदीचा असतो. याशिवाय जागतिक घडामोडी व शासकीय धोरणांचा परिणाम देखील चांदी उद्योगावर होतो.

६. **भांडवलाची समस्या**: चांदी उद्योगधंद्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते. परंतु चांदी उद्योगातील विभागानुसार भांडवलाची गरज कमी-जास्त असू शकते. काही विभागांमध्ये चांदी हा उद्योग भांडवल म्हणून गरजेचं असते. परंतु याच्या किंमतीमध्ये सतत वाढ होत असते. यासाठी मोठ्या भांडवलाची गरज भासते. तर काही विभागांमध्ये नवीन मशनरीच्या खरेदीसाठी भांडवलाची गरज असते. चांदी उद्योगातील जवळपास सर्वच विभागांमध्ये कामगारांना काही रक्कम अॅडव्हान्स / बाकी म्हणून द्यावी लागते. यासाठी देखील भांडवलाची गरज असते. परंतु ते सहज उपलब्ध होत नाही. भांडवलाची एक महत्त्वाची समस्या आहे.

७. **सुरक्षितेची समस्या:** चांदी हा अतिशय मौल्यवान व किमती धातू आहे. त्यामुळे त्याच्या सुरक्षेतेचा प्रश्न चांदी उद्योजकांना नेहमीच भेडसावत असतो. बऱ्याच वेळा चांदी चोरीला गेल्याचे मुलाखतीच्या वेळी चांदी व्यवसायिकांनी सांगितले. चांदीची चोरी करणाऱ्यांमध्ये व्यवसायात काम करणारे मजूर तसेच दागिन्यांच्या खरेदीसाठी येणारे गिऱ्हाईक तसेच काही वेळा त्यांच्या नातेवाईक व कुटुंबातील व्यक्तींचा समावेश असतो. तर काही वेळा फिरतीला गेल्यानंतर सुद्धा चोर लोक या व्यवसायिकांची चांदीची चोरी करतात.

८. **आधुनिकीकरणाचा अभाव**: हुपरी येथील चांदी उद्योगांमध्ये वापरली जाणारी मशिनरी व यंत्रसामग्री अजून सुद्धा थोड्याफार जुन्या पारंपारिक आहेत. याचा परिणाम चांदीच्या दागिन्याच्या सुबकतेवर किंवा दर्जावर होतो. हुपरीतील दागिने सेलम, आग्रा राजकोट, मथुरा इ. ठिकाणाच्या दागिन्यांच्या पेक्षा कमी आकर्षक व वजनाने जाड असतात याचे कारण आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव होय.

९. **चांदी मधील वाढती भेसळ**: चांदी मधील भेसळीचे प्रकार हुपरी मध्ये सारखेच घडतात. कमी टंचाची चांदी जास्त टंचाची आहे असे सांगून दिली जाते. चांदीमध्ये इतर धातू मिसळले

जातात. उदा. तांबे चांदीच्या पाटलांची अदलाबदल केली जाते. असे प्रकार येथे घडतात. असे मुलाखतीचे वेळी अनेक चांदी व्यवसायिकांनी सांगितले.

१०. **महागाईची समस्या:** वाढत्या महागाईचा परिणाम चांदी उद्योगावर देखील होत असतो. चांदी उद्योगातील वेगवेगळया विभागात रॉकेल, डिझेल व गॅसचा वापर इंधन म्हणून केला जातो. परंतु यांच्या किंमतीमध्ये सतत वाढ होत आहे. तसेच चांदी उद्योगासाठी आवश्यक व इतर साहित्य देखील दिवसेंदिवस महाग होत आहे. याशिवाय मजुरांचा पगार देखील वाढत आहेत. या सर्वाचा परिणाम उत्पादन खर्चात वाढ होऊन चांदी व्यवसाय दिवसेंदिवस न परवडणारा व तोट्याचा होत चाललेला आहे.

११. **व्यसनाधीनता:** या उद्योगांमध्ये काम करणारे कामगार ७० टक्के व्यसनाधीन आढळले.

**उपाय:**

१.वीज पुरवठा वारंवार खंडित होऊन उद्योजकांचे आर्थिक नुकसान होऊ नये तसेच मजुरांना नियमित काम मिळावे यासाठी शासनाने अखंड / कायम / नियमित वीजपुरवठा केला पाहिजे किंवा भारनियमन कमी केले पाहिजे.

२. चांदी उद्योगाला यंत्रमाग व्यवसाय प्रमाणे ठोस अनुदान व अर्थसहाय्य मिळावे. तसेच राष्ट्रीयकृत बँका व इतर महाराष्ट्र राज्य वित्त पुरवठा मंडळ यांच्याकडून चांदी व्यवसायिकांना दीर्घ मुदतीचे व कमी व्याजदरात भांडवल पुरवठा झाल्यास या उद्योगाची प्रगती होईल.

३. चांदी उद्योगातील कंपनी, प्रेस, सुत मशीन, व्हायब्रेटर या विभागातील ध्वनी, जल तसेच हवा प्रदूषणाचा त्रास कमी होण्यासाठी कारखाने नागरी वस्ती पासून दूर असावेत.यामुळेच सध्या सिल्व्हर झोन मध्ये काही कारखाने स्थलांतरीत केले आहेत. कारखान्यातील आवाजांचे परावर्तन कमी व्हावे या उद्देशाने भिंतीवर ध्वनी अवरोधित आच्छादन करावे तसेच कारखान्याच्या परिसरात झाडे लावावीत. ध्वनी प्रदूषण नियंत्रित होऊ शकते. तसेच ध्वनी प्रदूषणाचा त्रास कामगारांना होऊ नये म्हणून कामगारांना ध्वनी रोधक श्रवण यंत्रे मालकांनी पुरवावीत.

४.चांदी हा अतिशय मौल्यवान व किंमती धातू आहे. त्यामुळे त्याच्या सुरक्षितेचा प्रश्न चांदी उद्योजकांना नेहमीच भेडसावत असतो. चांदीची चोरी करणाऱ्यांमध्ये या व्यवसायात काम करणारे मजूर, दागिन्यांच्या खरेदीसाठी येणारी गिऱ्हाईक यांचा समावेश प्रामुख्याने

असतो यासाठी चांदी व्यवसायिकांनी आपल्या दुकानामध्ये तसेच कारखान्यामध्ये सीसीटीव्ही बसवावेत.

५. चांदी उद्योगातील वेगवेगळया विभागात रॉकेल, डिझेल व गॅसचा यांचा वापर इंधन म्हणून केला जातो. परंतु यांच्या किंमतीमध्ये सतत वाढ होत आहे. याचा परिणाम उत्पादन खर्चात वाढ होत आहे त्यामुळे शासनाने रॉकेल डिझेल गॅसचा कोटा नियंत्रित राहणे वाढवून द्यावा.

६.शासनाने चांदी धातूला वायदा बाजारातून वगळावे. कारण चांदीच्या भावातील दरातील चढउताराचा परिणाम चांदी उद्योगावर होतो. चांदीच्या भावात अचानक वाढ झाल्यास दागिन्यांची मागणी कमी होऊन मंदी येते. याशिवाय शासकीय धोरणांचा परिणाम देखील चांगली उद्योगावर होतो. शासनाने चांदीवरील आयात शुल्क रद्द करावे.

७.शासनाने नवीन कुशल कारागीर / मजूर निर्माण होण्यासाठी चांदी हस्तकलेचा व्यावसायिक अभ्यासक्रम तयार करून चांदी उद्योगाचे प्रशिक्षण द्यावे. याबरोबर मार्केटिंग कसे करावे यासाठी पदवी नंतर एम.बी.ए. पदवी कोर्स पूर्ण करावा.  तसेच नवीन तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यावे.

८. चांदी व्यवसायिक परराज्यात दागिन्यांच्या विक्रीसाठी जातात. काही वेळा पोलिसांकडून त्रास दिला जातो. उद्योजकांचे मानसिक व आर्थिक नुकसान केले जाते. यासाठी शासनाने चालू उद्योजकांना ओळखपत्र देऊन संरक्षण द्यावे. तसेच या व्यवसायासाठी परदेशी बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी.

९. हुपरी चांदी उद्योगाची आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे चांदीमध्ये वाढते भेसळीचे प्रमाण होय. यामुळे लोकांच्यामधील विश्वासहार्यता कमी होत आहे. या समस्येवर उपाय म्हणजे भेसळ करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करावी. तसेच संघटनेद्वारे त्यांच्या व्यवसायावर बंदी घातली पाहिजे.

१०. चांदी व्यवसायिकांनी कामगारांच्या वेदनातून काही रक्कम कपात करावी. त्यांच्यामध्ये स्वतःची काही रक्कम घालून भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करावी. याचा उपयोग काँग्रेसच्या वर्धापकाळातील संरक्षणासाठी होईल. तसेच चांदी व्यवसाय करणे आपल्या कामगारांचा अपघाती विमा काढावा जेणेकरून कामगाराला अपघातानंतर आर्थिक मदत मिळेल.

११. या व्यवसायामध्ये काम करणाऱ्या कामगार व मालक यांच्या करिता वर्षातून एक दोन वेळा सांस्कृतिक कार्यक्रर्मांचे आयोजन करावे.

**सारांश:**

हुपरी नगरच्या सामाजिक-आर्थिक विकासात चांदी उद्योगाची महत्त्वाची भूमिका आहे. अनियमित वीज पुरवठा, प्रदुषण, मजुरांची कमतरता, आरोग्य , मंदी, अपुरेभांडवल, असुरक्षितता, आधुनिकीकरणाचा अभाव, चांदीमधील भेसळ व वाढती महागाई इ. हुपरी नगरच्या चांदी उद्योगातील महत्त्वाच्या समस्या आहेत. शासनाने लक्ष घालून या उद्योगाच्या समस्या सोडविल्यास येथील चांदी उद्योगाची निश्चीतच प्रगती होईल. येथील चांदी उद्योगाच्या भविष्यातील वाढ आणि विकासासाठी अनेक संधी- आहेत.

**संदर्भ ग्रंथ:**


1. Alexanderson, G. (1988): Geography of Manufacturing, Prentice Hall of India pvt. Ltd, New Delhi.
2. Badde, N.S. (2014): Impact of Silver Industry on Socio-Economic Development of Hupari and Its Hinterland. Unpublished M.Phil synopsis, submitted to Shivaji University, Kolhapur.
3. Bhandare, S.A. (2007): Finances of Hupari village panchayat, Unpublished M.Phil. Dissertation, submitted to Shivaji University, Kolhapur.
4. Census of India (2011): District Census Handbook of Kolhapur district.
5. Chinchanekar, Y. S. (2002): A Critical Study of Gold marketing with special reference to Kolhapur city, Unpublished M. Phil. dissertation, submitted to Shivaji University, Kolhapur.
6. Patil, R. K. and Gadgil, D. R. (1953): Gold and Silver thread industry in Surat, Chunilal Gandhi Vidyabhavan, Surat.
7. Patil, S. J. and Choudhari, P.T. (2014): Problems of small scale industries in India, International jounal of engineering and Management Research, Vol. 4, pp 19-21.
8. चांदी कारखानदार (उद्योजक ) अस्सोसीएशन, हुपरी. वार्षिक अहवाल २०१७-१८
9. www.silverclusterhupari.com